VOL- X ISSUE- VI JUNE 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# कसमादे प्रदेशातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास

**प्रा. डॉ. घोलप एन एन**
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ताहाराबाद.
ता. -बागलाण, जिल्हा- नाशिक,(महाराष्ट्)

**सारांश-**

*भारत देश लोकसंख्येत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. आज भारतासारख्या देशात लोकसंख्येवर नियंत्रण आणणे हे अतिशय कठीण काम आहे. भारत सरकार व अनेक सेवाभावी संस्था यासाठी प्रयत्नशील आहेत. भारताची लोकसंख्या वाढ याच गतीने होत राहिली तर भविष्यात भारतासारख्या विकसनशील देशासमोर लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हीच मोठी समस्या होऊन बसेल. आज जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १७ टक्के लोकसंख्या एकट्या भारतात राहते.*

*तसेच भारतातील एक विकसित राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे महाराष्ट्राचा लोकसंख्या वाढीत दुसरा क्रमांक आहे. महाराष्ट्र सारख्या विकसित राज्याला लोकसंख्या वेगाने वाढत असल्यामुळे विकासात लोकसंख्या हा अडथळा ठरत आहे. केवळ लोकसंख्या वाढ होणे म्हणजे त्या प्रदेशाचा विकास होत नसून लोकसंख्येची गुणात्मक वाढ किती आहे यावर त्या प्रदेशाचा, राष्ट्राचा विकास अवलंबून असतो. म्हणून महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील कसमादे (कळवण,, सटाणा, मालेगाव देवळा) या तालुक्यातील २००१ ते २०११ या काळातील लोकसंख्यावाढ,घनता अभ्यासासाठी घेतलेली आहे, अभ्यास क्षेत्रातील लिंग गुणोत्तर, लोकसंख्येची घनताही अभ्यासली आहे.*

**प्रस्तावना-**

आज भारतासारख्या देशात लोकसंख्या वाढ ही एक समस्या होऊन बसलेली आहे. भारताची नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर होत आहे. त्यामुळे देशाची प्रगती अतिशय मंद गतीने सुरू आहे. भारताचा जगात लोकसंख्येमध्ये दुसरा क्रमांक आहे. परंतु लोकसंख्या ही एक साधन संपत्ती समजली जात असली तरी काही देशांची समस्या होऊन बसते. काही भागात लोकसंख्या वाढ ही समस्या होऊन बसलेली आहे. लोकसंख्येच्या वाढीवर जन्मदर, मृत्युदर, स्थलांतर तसेच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घटकांचा देखील परिणाम होत असतो. याचबरोबर भौगोलिक घटक देखील लोकसंख्या वाढीस कारणीभूत असतात. ज्या ठिकाणी अनुकूल परिस्थिती आहे त्या ठिकाणी लोकसंख्येचं केंद्रीकरण जास्त झालेले दिसते. तर ज्या ठिकाणी भौगोलिक घटक प्रतिकूल आहेत तेथे लोकसंख्या कमी असलेली दिसते. केवळ लोकसंख्या वाढ म्हणजे त्या राष्ट्राचा किंवा त्या प्रदेशाचा विकास नव्हे. लोकसंख्या वाढ ही गुणात्मक असायला पाहिजे. तरच त्या प्रदेशाचा विकास चांगल्या पद्धतीने होऊ शकतो. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. जर भारतासारख्या खंडप्राय देशाचा लोकसंख्या वाढीचा वेग असाच सुरु राहिला तर भविष्यात ही समस्या अधिक उग्र स्वरूप धारण करू शकते.

भारतातील महाराष्ट्र हे एक अग्रगण्य राष्ट्र म्हणून आज ओळख आहे लोकसंख्या वाढीत राज्याचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा हा एक प्रगत वेगाने विकसित होणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याचा महाराष्ट्रात लोकसंख्या वाढीत चौथा क्रमांक लागतो. नाशिक जिल्ह्यातील भौगोलिक दृष्ट्या कसमादे हा विभाग वेगळा समजला जातो. या विभागात (कळवण,, सटाणा मालेगाव, देवळा) या तालुक्यांचा समावेश होतो. या विभागातील लोकसंख्या वाढ ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणून संशोधन पेपर मध्ये या तालुक्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तेथील लोकसंख्या वाढ, लोकसंख्या वाढीची कारणे, त्यामागे असणारी पार्श्वभूमी, तेथील भौगोलिक घटक, सामाजिक घटक, सांस्कृतिक घटक,राजकीय घटक व शिक्षणाचा दर्जा या घटकांना अनुसरून अभ्यास करण्यात आलेला आहे.

**बीज वाक्य-** लोकसंख्या वाढ, घनता, स्त्री पुरुष प्रमाण उपाययोजना

**अभ्यास उद्दिष्टये**

१) अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या वाढीचा तुलनात्मक अभ्यास करणे

२ ) लोकसंख्येची घनता व कारणे यांचा अभ्यास करणे

३) स्त्रीया व पुरुष यांच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती**

या संशोधनामध्ये दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यासाठी नाशिक जिल्ह्याचे जनगणना बुक, बातमीपत्र, तसेच तालुक्यांची जनगणना याचा वापर करून आकडेवारी मिळवलेली आहे. तसेच इतर संदर्भ पुस्तके यांचा देखील वापर करण्यात आलेला आहे. संशोधन पद्धतीमध्ये पुढील सूत्राचा वापर करून लोकसंख्येची वाढ व घनता काढलेली आहे.

$P_n - p_o$

r = ---------------x 100

r = लोकसंख्या वाढीचा दर

Pn = आधीच्या जनगणनेतील लोकसंख्या

Po = नंतरच्या जनगणनेतील लोकसंख्या


**विशिष्ट प्रदेशाची एकूण लोकसंख्या**

**२) घनता =**-------------------------------------------

**त्याच प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ**


**अभ्यास क्षेत्र-**


अभ्यासासाठी अभ्यास क्षेत्र निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये कळवण, सटाणा, मालेगाव व देवळा या तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.यालाच कसमादे म्हणूनही ओळखले जाते. हे अभ्यासक्षेत्र विशिष्ट भौगोलिक स्थानात वसलेले आहे. अभ्यास क्षेत्राच्या उत्तरेला धुळे जिल्ह्याची सीमा व वायव्येस गुजरात राज्याची सीमा लाभलेली आहे. पूर्वेला औरंगाबाद जिल्ह्याची सीमा लागलेली आहे. तसेच दक्षिणेला चांदवड, दिंडोरी या तालुक्यांच्या सीमा लाभलेल्या आहेत. अशा भौगोलिक क्षेत्रात हे अभ्यासक्षेत्र वसलेले आहे. अभ्यास क्षेत्राचा सर्वसाधारण अक्षवृत्तीय विस्तार १८ अंश ९८ मि.उ ते २० अंश ४२ मि.उ असा असून रेखावृत्तीय विस्तार-७४ अंश ०२ मि.पू ते ७४ अंश ५२ मि.पू असा आहे. नाशिक जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळापैकी या अभ्यास क्षेत्राने सुमारे ४७११.८४ इतके चौरस कि.मीटर क्षेत्रफळ व्यापलेले आहे.




**कसमादे मधील लोकसंख्येची वाढ व लिंग गुणोत्तर (तक्ता क्रमांक- १)**


| | | २००१ | | | | २०११ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. नं.** | **तालुका** | **एकूण लोकसंख्या** | **पुरुष** | **स्त्रिया** | **लिंग गुणोत्तर** | एकूण लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | **लोकसंख्या वाढ** | लिंग गुणोत्तर |
| १. | **कळवण** | १६५४३७ | ८३७८९ | ८१६४८ | ९७४ | २०८३६२ | १०६१३० | १०२२३२ | **२५.९४** | ९६३ |
| २. | **सटाणा** | ३११४८ | १५९७१४ | १५१४३४ | ९४८ | ३७४४३५ | १९३०७२ | १८१३६३ | **२०.३३** | ९३९ |
| ३. | **मालेगाव** | ७८८९६१ | ४०५४१६ | ३८३५४५ | ९४६ | ९५५५९४ | ४९०३०३ | ४६५२९१ | **२१.१२** | ९४९ |
| ४. | **देवळा** | १३००१३ | ६७४२१ | ६२५९२ | ९२८ | १४४५२२ | ७५३०५ | ६९२१६ | **११.१५** | ९१९ |




**तक्ता क्रमांक-१** मध्ये एकूण लोकसंख्या लोकसंख्येची वाढ व लिंग गुणोत्तर यांची आकडेवारी दर्शविलेली आहे. तक्त्यानुसार एकूण लोकसंख्या विचारात घेता या अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या ही सातत्याने वाढत असल्याचे चित्र दिसते. सर्वात जास्त लोकसंख्या वाढ ही कळवण या आदिवासी तालुक्याची असून ती २५.९४ टक्के इतकी आहे. याला वेगवेगळी कारणे असलेली दिसतात. त्यामध्ये लोकांची निरक्षरता,मुलींकडे बघण्याचा दृष्टिकोन अजूनही बदललेला दिसत नाही. तसेच आरोग्य सुविधा यांची कमतरता, रूढी परंपरा, यांचा पगडा असल्याचे दिसते. एकूण लोकसंख्येचा विचार करता सर्वात जास्त लोकसंख्या मालेगाव या तालुक्याची असून या तालुक्याची १० वर्षात २१.१२% ने वाढ झालेली आहे. सटाणा तालुक्याची १० वर्षात लोकसंख्या वाढ २०.३३%नी झालेली आहे. देवळा तालुक्यात सर्वात कमी लोकसंख्या वाढ असून ती.११.१५% इतकीच आहे.

अभ्यास क्षेत्रातील लिंग गुणोत्तर विचारात घेता असे दिसते की, सातत्याने त्या तालुक्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण दर १००० कमी होत आहे. अभ्यास क्षेत्रातील सर्वात जास्त कळवण तालुक्यात लिंग गुणोत्तरात तफावत असल्याचे दिसून येते. २००१ मध्ये ९७४ इतके दर हजारी स्त्रियांचे प्रमाण होते. परंतु २०११ मध्ये हेच प्रमाण ९६३ इतके कमी झाल्याचे दिसते. एकूण १० वर्षांमध्ये या तालुक्यात ११ ने घट झालेली आहे. सटाणा तालुक्यात २००१ मध्ये दर १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४८ इतके होते, तर हेच प्रमाण २०११ मध्ये ९३९ वर आल्याचे दिसते. या तालुक्यात १० वर्षांमध्ये स्त्रियांच्या प्रमाणात ९ ने घट झालेली आहे. मालेगाव तालुक्यात २००१ मध्ये दर १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४६ इतके होते, तर २०११ मध्ये हेच स्त्रियांचे प्रमाण दर १००० पुरुषांमागे ९३९ इतके झाले याचाच अर्थ असा की, या तालुक्यात ३ ने दर १००० पुरुषांमागे स्त्रियांची संख्या वाढलेली आहे. ही एक आनंदाची बाब म्हणून विचारात घ्यावी लागेल. देवळा तालुक्यात २००१ मध्ये दर १००० पुरुषांमागे ९२८ इतके स्त्रियांचे प्रमाण असून २०११ मध्ये या प्रमाणात घट होऊन ते ९१९ इतके झालेले आहे. १० वर्षाच्या लिंग गुणोत्तरात ९ ने घट झालेली आहे. एकूणच या अभ्यास क्षेत्रात मालेगाव वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये दर १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण घटत आहे, ही एक खेदाची बाब म्हणून विचारात घेणे आवश्यक आहे.





कारण या अभ्यास क्षेत्रात लोकांची निरक्षरता मुलीपेक्षा मुलगाच पाहिजे अशी कुठेतरी भावना यामागे दडलेली दिसते तसेच निरक्षरता रूढी परंपरा या विविध

घटकांचा परिणाम या लिंग गुणोत्तराच्या बदलावर झालेला दिसतो म्हणून ही बाब अतिशय गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

**लोकसंख्येची घनता (तक्ता क्रमांक -२)**

| | वर्ष | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं | तालुका | एकूण लोकसंख्या | क्षेत्रफळ चौ.कि.मी, | घनता | एकूण लोकसंख्या | क्षेत्रफळ चौ.कि.मी, | घनता |
| १. | कळवण | १६५४३७ | ८६४ | १९२ | २०८३६२ | ८६४ | २४१ |
| २. | सटाणा | ३१११४८ | १४५३.४० | २११ | ३७४४३५ | १४५३.४० | २५८ |
| ३. | मालेगाव | ७८८९६१ | १८१८.४४ | ४३२ | ९५५५९४ | १८१८.४४ | ५२६ |
| ४. | देवळा | १३००१३ | ५७६ | २२५ | १४४५२२ | ५७६ | २६४ |




**तक्ता क्रमांक-२** नुसार अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या घनतेचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, कसमादे ( कळवण, सटाणा, मालेगाव, देवळा) या चारही तालुक्यातील लोकसंख्या घनता सातत्याने वाढत आहे. २००१ ते २०११ या १० वर्षाच्या कालावधीत सर्वच तालुक्यातील घनता सातत्याने वाढत आहे. या अभ्यास क्षेत्रात मालेगाव तालुक्याची घनता २००१ ते २०११ या दहा वर्षाच्या कालावधीत दर चौ. कि.मी ला ९४ ने वाढलेली आहे. या तालुक्याची लोकसंख्या घनता २००१ मध्ये ४३२ इतकी होती. घनतेत वाढ होऊन ती ५२६ दर चौ.कि.मी. इतकी झालेली आहे.

तसेच अभ्यास क्षेत्रातील कळवण तालुक्याची २००१ मध्ये लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला १९२ इतकी असून तिच्यामध्ये वाढ होऊन ती २४१ वर जाऊन पोहोचलेली आहे. याचाच अर्थ असा की, १० वर्षांमध्ये ४९ ने या लोकसंख्या घनतेत भर पडलेली आहे. सटाणा तालुक्याची घनता २११ वरून २०११ मध्ये ती दर चौरस कि.मीला २५८ इतकी झालेली आहे. दहा वर्षाच्या कालावधीत या तालुक्यात ४७ ने लोकसंख्या घनतेत वाढ झालेली आहे. सर्वात कमी देवळा तालुक्याची घनता असून २००१ मध्ये दर चौ.कि.मी.ला २२५ इतकी लोकसंख्येची घनता होती. २०११ मध्ये तिच्यात वाढ होऊन ती २६४ वर पोहोचलेली आहे. या तालुक्यात दहा वर्षात ३९ ने भर पडलेली आहे. संथगतीने लोकसंख्या घनतेत वाढ होत राहिली तर पुढे ३० ते ४० वर्षामध्ये या प्रदेशातील साधन संपत्तीवर निश्चितच ताण पडेल. मूलभूत गरजा भागविणे अशक्य होईल भविष्यात रोजगार सुविधांची कमतरता निर्माण होईल.

**समस्या-**

अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची वाढ लोकसंख्येची घनता व लिंग गुणोत्तर यांचा अभ्यास केल्यानंतर एकूणच लोकसंख्या वाढ ही सातत्याने वाढत असल्याने घनतेतही वाढ होत आहे. तसेच लिंग गुणोत्तरही कमी होत आहे या सर्व बाबींचा विचार करता असे दिसते की, या अभ्यास क्षेत्रात मूलभूत गरजांवर ताण पडेल, अन्नधान्याची कमतरता निर्माण होईल. भविष्यात प्रत्येकाला रोजगार उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. बेकारीत वाढ होईल बऱ्याच लोकांना रोजगार उपलब्ध होणार नाही. तसेच रोजगार मिळवण्यासाठी या भागातील लोकांना स्थलांतर करावे लागेल. प्रादेशिक विषमता निर्माण होईल, लोकांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन सामाजिक अस्थिरता निर्माण होऊन नैतिक मूल्यांचा ऱ्हास होईल. प्रदेशाचा विकास थांबेल. अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागेल. यासाठी वेळीच लोकसंख्या नियंत्रण

करणे, रोखणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सरकारने योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. कारण या प्रदेशातील लोकांची निरक्षरता रुढी परंपरा यांचा पगडा कमी करण्यासाठी त्यांना शिक्षण देणे,जाणीव जागृती करणे, लहान कुटुंबाचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. गर्भपात केंद्रांवर कटाक्षाने नियंत्रण ठेवणे. यासाठी सरकारने नवीन कायद्यांची तरतूद करणे, जर एखाद्या दाम्पत्याने दोन मुलांपेक्षा जास्त अपत्यांना जन्म दिला तर त्याचे रेशन थांबविणे. याउलट एखाद्याने एकाच आपत्याला जन्म दिला तर त्यासाठी प्रोत्साहनपर योग्य सुविधा दे णे, काही सरकारी विशेष योजना राबविणे, सरकारी सेवेत त्यांना विशेष जागा देणे, एकच अपत्य असेल तर अशा लोकांना वेगळ्या सुविधा देणे, सरकारी सेवेत असेल तर त्यांना वेगळी पगार वाढ देणे. अशा काही गोष्टी केल्या तर लोकांमध्ये एक चांगला संदेश जाऊन हळूहळू लोक याचा सकारात्मक विचार करून काही प्रमाणात लोकसंख्या नियंत्रण करता येईल.

## निष्कर्ष

अभ्यास क्षेत्रात लोकसंख्येच्या विविध घटकांचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष मिळतात. अभ्यास क्षेत्रात सातत्याने लोकसंख्या वाढ होत आहे. तसेच या क्षेत्रातील दर १००० स्त्रियांचे प्रमाण कमी- कमी होत आहे. केवळ मालेगाव तालुक्यातच दर १००० महिलांचे प्रमाण जास्त आहे. सर्वात जास्त स्त्रियांच्या प्रमाणात घट कळवण तालुक्यात असल्याचे दिसतें. अभ्यास क्षेत्रात सर्वात जास्त लोकसंख्या वाढ कळवण तालुक्यात होत असून सर्वात कमी लोकसंख्येची वाढ देवळा या तालुक्यात आहे. अभ्यास क्षेत्रात मालेगाव वगळता सर्वच तालुक्यांमध्ये स्त्रियांची संख्या घटत आहे. मालेगाव तालुक्यात २००१ ते २०११ या १० वर्षात ३ ने दर १००० पुरुषांमागे स्त्रियांची संख्या वाढलेली आहे. ही एक चांगली बाब आहे. लोकसंख्येची लोकसंख्येचे घनता वेगाने कळवण तालुक्यात वाढत असून सर्वात कमी लोकसंख्येची घनता देवळा तालुक्यात आहे.

**संदर्भ-**

1. Geography of Population,(Hindi) (2021) R.C. Chandna, Publisher: Kalyani Publisher, New Delhi,
2. **लोकसंख्या भूगोल (१९९७) डॉ . टी . एन. घोलप,निशिकांत प्रकाशन,पुणे पा.१५७ ,१५८**
3. भारताचा भूगोल ,(२००७) डॉ . डी . वाय . अहिरराव ,इनसाईट पब्लिकेशन ,नाशिक पा .२४०,२४१
4. U.Mandvi (2017) "The distribution and growth rate of population in Vidarbha Region"Aayushi international interdisciplinary research journal Vol-IV Issue -XII,December 2017 p.113
5. Barakade A.J. (2012),Declining Sex Ratio: An Analysis With Special Reference To Maharashtra State.Volume 3, Issue 1, 2012, pp.-92-95.
6. डॉ.कुलकर्णी एस. एन,डॉ. सतीश श्रीवास्तव(१९९८), लोकसंख्याशास्त्र आणि लोकसंख्या शिक्षण,विद्या प्रकाशन ,नागपूर. पा .३१,३२,३३,
7. Chandna, R. C. (2000): "Geography of Population — Concepts, Determinants and Patterns", Kalyani Publications, New Delhi, pp. 245-246.
8. Dr.Landage S.S. A Study of PopulationArithmetic Density in Georai Taluka, Peer Reviewed international Research journal of geography impact factor 4.567Renew (IIFS),MBP-Vol,No-1,Jun-2021
9. Dr,Godawari A,Gaurkar,Population Growth In Chandrapur District, Peer Reviewed international Research journal of geography impact factor 4.567Renew (IIFS),MBP-Vol,No-1,Jun-2021
10. Dr.M.S.Naravane (1997),A Short History Of Baglan,Palomi Publications.Aund,Pune